आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ जून २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- देशभरातल्या सर्वच ५४३ लोकसभा मतदारसंघांचे निकाल जाहीर भाजपप्रणित एनडीएला २९२ जागांसह स्पष्ट बहुमत / राज्यात काँग्रेसला सर्वाधिक १३ जागा

- एनड़ीए आणि इंडिया आघाडीच्या महत्त्वाच्या बैठका आज दिल्लीत, सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग

- जागतिक पर्यावरण दिन आज जगभरात साजरा / हरित जगाच्या निर्मितीसाठी सामूहिक प्रयत्न करण्याचं राष्ट्रपतींचं आवाहन

**आणि**

- आयसीसीसी टी - २० विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा मुकाबला आर्यलंडबरोबर

**<><><><><>**

देशातल्या लोकसभा निवडणुकीचे निकाल काल जाहीर झाले. या निवडणुकीत भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने **५४३** पैकी **२९२** जागा जिंकून बहुमत मिळवलं आहे. तर काँग्रेस प्रणित इंडिया आघाडीला **२३३** जागांवर यश मिळालं आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत भाजपा आणि रालोआच्या जागा कमी झाल्या आहेत, तर काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या जागांमध्ये वाढ झाली आहे. रालोआला बहुमत दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातल्या जनतेचे आभार मानले आहेत.

**भाजपाला** मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशात एकहाती विजय मिळाला, तर पंजाब आणि तमिळनाडूत त्यांना

खातं उघडता आलं नाही. उत्तर प्रदेशात मागच्या वेळी **६२** जागा जिंकणाऱ्या भाजपाच्या जागा यावेळी निम्म्यावर आल्या. इथं त्यांनी **३३** जागा जिंकल्या. तर समाजवादी पक्षाने उत्तर प्रदेशात **३७** आणि काँग्रेसने सहा जागांवर विजय मिळवला. आंध्रप्रदेशात तेलुगु देसमने **१६**, भाजपने **३** जागा जिंकल्या. आसाममध्ये भाजपाला ९, काँग्रेसला **३**; छत्तीसगडमध्ये भाजपाला **दहा**, काँग्रेसला **एका** जागेवर यश मिळालं. झारखंडमध्ये भाजप ८, झारखंड मुक्ती मोर्चा **३** आणि काँग्रेसने **दोन** जागा जिंकल्या. हरियाणामध्ये भाजपा आणि काँग्रेसला प्रत्येकी **पाच** जागांवर यश आलं.

**ओडिशात** भाजपाने मुसंडी मारत **१९** जागांवर विजय मिळवला, तर बिजु जनता दल आणि काँग्रेसच्या वाट्याला प्रत्येकी **एक** जागा आली.

**कर्नाटकमध्ये** भाजापा **१७**, काँग्रेस ९ आणि जेडीएस **दोन** जागांवर यशस्वी झाले. तेलंगणामध्ये काँग्रेस आणि भाजपाला प्रत्येकी ८ मतदारसंघात जनतेने कौल दिला. तर एमआयएमने हैदराबादची **एक** जागा राखली. गुजरातमध्ये भाजपाने **२५** जागांवर विजय मिळवला, तर काँग्रेसने अनेक वर्षांनी **एका** जागेवर आपलं खातं उघडलं आहे.

**बिहारमध्ये** भाजपा आणि जेडीयू प्रत्येकी **१२**, लोजपा **५**, काँग्रेस **३** आणि भाकप माले **दोन** जागांवर विजयी झाले. **पश्चिम बंगालमध्ये** तृणमूल काँग्रेसने **२९**, काँग्रेस **एक** तर भाजपाने **१२** जागा जिंकल्या. **तमिळनाडूत** द्रमुक **२२**, काँग्रेस ९ तर माकप आणि भाकप प्रत्येकी **दोन** जागांवर विजयी झाले. **केरळमध्ये** काँग्रेसने **१४** तर माकप आणि भाजपाने प्रत्येकी एका जागेवर यश मिळवलं. तर **पंजाबमध्ये** काँग्रेसला **सात** आणि आम आदमी पक्षाला **तीन** जागांवर यश मिळालं. **काश्मीरमध्ये** नॅशनल कॉन्फरन्स आणि भाजपाच्या वाट्याला प्रत्येकी **दोन** जागा आल्या. याशिवाय, **मणिपूरच्या दोन** आणि नागालँड, चंदीगड, लक्षद्वीप, **पुद्दुचेरी** इथल्या प्रत्येकी **एका** जागेवर काँग्रेसनं विजय मिळवला.

<><><><><>

सरकार स्थापनेविषयी चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीची महत्त्वाची बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. लोक जनशक्ती पार्टीचे प्रमुख चिराग पासवान यांनी ही माहिती प्रसार माध्यमांना दिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपलं अभिनंदन केलं असून या बैठीकीची माहिती दिली असून आपण या बैठकीला उपस्थित राहणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

या बरोबरच इंडिया आघाडीची बैठकही आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी होत आहे. या बैठकीत इंडिया आघाडीचे सर्व घटक पक्ष उपस्थित राहणार असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरेही उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीचे निकाल स्पष्ट झाल्यानंतर सत्तास्थापनेसाठीच्या हालचालींना वेग आला आहे. या निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएला २९२ जागांसह स्पष्ट बहुमत मिळालं आहे. भाजपला २४०, तेलुगू देसम पक्षाला १६, तर संयुक्त जनता दलाला १२ जागा मिळाल्या आहेत. इंडिया आघाडीला २३३ जागांवर विजय मिळाला आहे. यात काँग्रेसच्या ९९, समाजवादी पक्षाच्या ३७, तर तृणमूल काँग्रेसच्या २९ आणि द्रमुकच्या २२ जागांचा समावेश आहे. इतर पक्षांना १८ जागा मिळाल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याच्या दृष्टीनं रणनीती ठरवण्यासाठी एनडीएची बैठक आज नवी दिल्ली इथं होणार आहे. लोक जनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान, तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू, संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार या बैठकीत सहभागी होणार आहेत.

इंडिया आघाडीची बैठकही आज संध्याकाळी नवी दिल्लीत होणार आहे. निवडणुकीचे निकाल आणि नंतरची रणनीती यावर या बैठकीत चर्चा होणार असल्याचं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या लोकसभेच्या सर्व ४८ जागांचे निकाल जाहिर झाले असून महाविकास आघाडीला ३० तर महायुतीला १७ जागा मिळाल्या आहेत. राज्यात काँग्रेसनं सर्वात जास्त १३ जागांवर विजय मिळवला असून भाजपानं ९ जागा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं ९, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानं ८, शिवसेनेनं ७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं एका जागेवर विजय मिळवला आहे. तर एक अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे.

मुंबई विभागात **उत्तर मुंबई** मतदारसंघात भाजपाचे पीयूष गोयल विजय झाले. मात्र, **उत्तर मध्य मुंबईत** काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी भाजपाचे उज्ज्वल निकम यांचा पराभव केला. **दक्षिण मुंबई** मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, **दक्षिण मध्य मुंबईत** अनिल देसाई, आणि **ईशान्य मुंबईत** संजय दिना पाटील विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा होत आहे. पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली सुरु करण्यात आलेला हा एक जागतिक उपक्रम आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पर्यावरण दिना निमित्त जनतेला शाश्वततेवर आधारित चांगल्या आणि हरित जगाची निर्मिती करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचं आवाहन केलं आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पृथ्वी मातेचं रक्षण करणं ही आपली मूलभूत जबाबदारी असल्याची स्वतःला जाणीव करून देऊया,

असं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे. मानवता आणि निसर्ग यांच्यातला  सुसंवाद हा शाश्वत जीवनाचा पाया असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी पर्यावरण दिना निमित्त दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित, 'एक पेड माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथल्या बुद्ध जयंती उद्यानात एक रोपटं लावलं. देशभरात कोट्यवधी झाडं लावण्याच्या उद्देशानं सुरु करण्यात आलेला हा आगळा वेगळा उपक्रम आहे.

**<><><><><>**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांच्या काल लागलेल्या निकालावर विविध पक्षाचे नेते प्रतिक्रिया देत आहेत.

भाजपच्या नेतृत्वातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले आणि देशाच्या इतिहासातला हा एक अभूतपूर्व क्षण असल्याची ग्वाही दिली. देशवासीयांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी नवी ऊर्जा आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विरोधकांना जनतेनं सत्तेपासून दूर ठेवलं, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केलं. जनतेनं भाजपप्रणित एनडीएला स्पष्ट बहुमत दिलं आहे आणि नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा प्रधानमंत्री होत आहेत. महाराष्ट्रात एनडीएला कमी जागा मिळाल्या आहेत, याच्या कारणांचा शोध घेतला जाईल, असंही शिंदे म्हणाले.

सामान्य जनतेची ताकद दाखवून दिल्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. पक्षाचं वेगळं नाव आणि चिन्हावर निवडणूक लढवूनही आपल्या पक्षानं चांगली कामगिरी केल्याचं ते मुंबईत वार्ताहर परिषदेत म्हणाले. इंडिया आघाडीच्या बैठकीला आपण जाणार

असल्याचं सांगून इंडिया आघाडीनं सरकारस्थापनेचा दावा करावा, असंही ठाकरे यांनी सुचवलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हा नैतिक पराभव स्वीकारावा आणि तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. भाजप ४०० पेक्षा जास्त जागा जिंकेल, असा दावा त्यांनी प्रचारादरम्यान केला होता, पण स्वबळावर बहुमताचा आकडा गाठण्यातही त्यांना अपयश आलं, असं ममता यांनी वार्ताहर परिषदेत नमूद केलं.

**<><><><><>**

आयसीसीसी टी - २० विश्वचषक  स्पर्धेत आज भारताचा ‘अ’ गटातला पहिला सामना आर्यलंड बरोबर होणार आहे. न्युऑर्क मधल्या नासाऊ काऊंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडीयमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरु होईल. या आधी गेल्या शनिवारी भारतीय संघानं आपल्या पहिल्या सराव सामन्यात बांगलादेशवर ६० धावांनी विजय मिळवला होता.

**//<><><><><>//**